# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२४ जुलै २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


# लॉकडाउन दरम्यान चंद्रपुर पोलीसाची ऑल आऊट ऑपरेशन १०२४ केसेस दाखल, २ लाख रुपये दंड वसुल

चंद्रपुर शहरात लॉकडाउन असतांना नागरीकांनी सोशल डिस्टेन्सिंगचे पालन करुन मास्क वापरणेबाबत आदेश पारित झाले आहेत. आदेशाचे उल्लघंन होवु नये या करिता प्रशासनाकडुन वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. परंतु उल्लंघन करणाऱ्या इसमांवर आज रोजी चंद्रपुर पोलीस दलातर्फे ऑल आऊट ऑपरेशन राबवुन कार्यवाही करण्यात आली आहे.

दिनांक २४ जुलै २०२० रोजी नागरिकांनी आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या इसमावर ज्या मध्ये मास्क न वापरने व सोशल डिस्टेन्सिंगचे नियम न पाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली असुन या मध्ये मास्क न वापरणाऱ्या इसमाविरुध्द ७४५ केसेस दाखल करण्यात आल्या असुन १,४८,१००/—रु दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच सोशल डिस्टेन्सिंगचे पालन न करणाऱ्यांविरूध्द ५४ केसेस दाखल करण्यात आल्या असुन १२,२००/—रु दंड वसुल करण्यात आला असुन तसेच इतर हेड खाली २२५ केसेस करुन ४६,७००/—रु दंड वसुल करण्यात आला असुन अश्या एकुण १०२४ केसेस करण्यात आल्या व एकुण २,०७,०००/—रू दंड वसुल करण्यात आला आहे.

चंद्रपुर पोलीस दलातर्फे आज पासुन विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली असुन यापुढे कोणीही नियमाचे पालन करणार नाही त्याचेविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात येईल. दंडात्मक कार्यवाही झाल्यानंतरही कोणी पुन्हा नियमाचे पालन न केल्यास अश्या इसमावर गुन्हा दाखल करण्यात येईल.

तरी, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी चंद्रपूर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे की, चंद्रपूर जिल्हयात कोरोना (Covid-19) विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाद्वारे निर्गमित केलेल्या संचारबंदी आदेशाचे पालन तसेच मास्क व सोशल डिस्टेन्सिंगचे नागरीकांनी काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

———————————————————————————